RNI No. MAHBIL/2009/37831

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक १२६] शनिवार, सप्टेंबर ७, २०१९/भाद्र १६, शके १९४१ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३१३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ सप्टेंबर २०१९

आदेश

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१.

क्रमांक एमटीएस. ०९०९/१५३२/प्र.क्र. ५९२/पोल-४.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम ५(ब) आणि त्या अनुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखालील पोलीस विभागातील " महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, २०१९ " या पदांचे सेवाभरती विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे, जसे :—

१. **या नियमांना " महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक, (सेवाप्रवेश) नियम, २०१९ " असे संबोधण्यात यावे.**

२. **व्याख्या–** या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) ' **विभाग** ' याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृह विभाग, असा आहे ;

(ब) ' **महासंचालक** ' याचा अर्थ पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई असा आहे ;

(क) ' **शासन** ' याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ड) ' **उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा** ' याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा. ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळांकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे ;

(इ) ' **अनुज्ञप्ती प्राधिकारी** ' याचा अर्थ, मोटार वाहन कायदा, १९८८ मधील प्रकरण दोन अन्वये अनुज्ञप्ती अदा करण्याकरिता प्राधिकृत केलेले प्राधिकारी ;

(फ) ' **पोलीस दल** ' याचा अर्थ, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले पोलीस दल, असा आहे ;

(ग) ' **पोलीस घटक** ' याचा अर्थ, विविध पोलीस आयुक्त कार्यालये व जिल्हा पोलीस अधीक्षक यांची कार्यालये असा आहे ;

Scanned with CamScanner

४. असे उमेदवार भरती झालेल्या जिल्ह्याच्या बाहेर बदलीस पात्र असणार नाहीत.

(ब) अनुकंपा तत्त्वावरील भरती :— अनुकंपा तत्त्वावरील भरतीसंदर्भात खालीलप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल.

छाती :— २ सें.मी. न फुगविता व १.५ सें.मी. फुगवून पुरूष उमेदवारांसाठी

७. लेखी चाचणी (१००) गुण :—

(अ) जे उमेदवार शारीरिक व शैक्षणिक पात्रतेमध्ये पात्र ठरतील, त्यांची एकूण १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

(ब) लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल.—

(i) अंकगणित

(ii) सामान्यज्ञान व चालू घडामोडी

(iii) बुद्धीमत्ता चाचणी

(iv) मराठी व्याकरण, आणि

(v) मोटार वाहन चालविणे/वाहतुकीबाबतचे नियम.

(क) लेखी चाचणीसाठी कालावधी ९० मिनिटांचा असेल व सदर लेखी चाचणीमधील प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे राहतील आणि सदर चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल.

८. वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी (५०) गुण :—

(१) शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी खालीलप्रमाणे द्यावी लागेल. सदर दोन्हीही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल.

(२) सदर कौशल्य चाचणीमध्ये खालील बाबी अंतर्भूत असतात.

(अ) हलके वाहन (LMV) प्रकारातील वाहन चालविणे	२५ गुण
(ब) जीप प्रकारातील वाहन चालविणे	२५ गुण

(३) सदरहू चाचणी अर्हता चाचणी असल्याने, सदरहू चाचणीत प्राप्त झालेले गुण गुणवत्तायादी तयार करताना विचारात घेतले जाणार नाहीत.

(४) सदर वाहन चालवण्याच्या कौशल्य चाचणीबाबतचे निकष वेळोवेळी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत ठरविण्यात येतील.

(५) सदर पदासाठी कौशल्य चाचणी परीक्षा घेण्यासाठी गठीत करावयाच्या समितीस प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिका-यांचा समावेश करण्यात येईल.

९. शारिरिक चाचणी (५०) गुण :—

(१) जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५ टक्के (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३ टक्के) गुण मिळवून उत्तीर्ण होतील, असे उमेदवार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ :१० या प्रमाणात शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

स्पष्टीकरण .— उदाहणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १०० (१० × १० = १००) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० (५ × १० = ५०) उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतील.

तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शासीरिक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील.

Scanned with CamScanner

१६. (१) पोलीस शिपाई चालक या पदाकरिता निवड करण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाही. मात्र, हे उमेदवार विनंतीनुसार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र ठरतील.

(२) पोलीस शिपाई चालक या पदावर नियुक्त केलेला कर्मचारी, त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातून इतर पोलीस घटकात बदलीसाठी, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्य शासनाच्या मान्यतेने निर्धारीत केलेली बदलीसाठी पात्रता, बदली प्रक्रिया, सक्षम प्राधिकारी, ज्येष्ठता आणि इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. ज. सोवितकर,

शासनाचे सहसचिव.

Scanned with CamScanner

(*B*) Educational Qualification—Have passed the Higher Secondary School Certificate Examination;

(*C*) Special Qualification—

(1) A candidate at the time of submitting his application is required to possess Light Motor Vehicle (LMV-TR) licence issued by Competent Authority.

(2) A candidate appointed on the said post shall have to possess Heavy Goods Vehicle Driving Licence (HGV) and Heavy Passenger Motor Vehicle (HPMV) driving licence within five years from his appointment, failing which he shall not be eligible for further increments and promotions.

(3) Candidate should not have been convicted under the Motor Vehicle Act, 1988, for driving under influence of alcohol or any psychotropic substances.

(*D*) Physical Qualification—

Sr. No.	Measurement	Female	Male
(1)	(2)	(3)	(4)
(i)	Height	Shall not be less than 158 Centimeters	Shall not be less than 165 Centimeters.
(ii)	Chest	. . .	Shall not be less than 79 Centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 Centimeters.

(2) Relaxations in educational and physical qualification—

(A) Special provisions for Naxal affected areas :–

(*a*) Educational Qualification.–Candidates belonging to the Schedule Tribes category or children of Police Informants, Police Patils or Policemen who are killed or seriously injured in Naxal attacks or operations against Naxal and have pass 7th standard examination; and are residing in areas notified by the Government as Naxal affected area, shall be eligible for recruitment.

(*b*) Physical Qualifications.–Relaxations for the candidates belonging to the Scheduled Tribes category or children of Police Informants or Police Patils or Police Policemen who are killed or seriously injured in Naxal attacks or operations against Naxal and who are residing in the areas notified by the Government as Naxal affected areas, are enumerated to the extent as set out below,–

Chest-measurement is not required.

(*c*) The powers of relaxation in educational and physical qualification prescribed in sub-clauses *A(a)* and *B(b)* above in respect of candidates residing in the Naxal affected areas notified by the Government shall be with the Additional Director General, Training and Special Units, Maharashtra State.

(*d*) Such candidates shall not be entitled for transfer outside the District of recruitment.

(*B*) Recruitment under compassionate grounds–Following relaxation shall be available for recruitment on the compassionate grounds–

Chest :– 2 cms without inflating the chest and 1.5 cms for inflated state.

7. Written Test (100 marks)–

(*A*) The candidates who fulfill the physical and educational qualifications shall be required to appear for written test of 100 marks.

Scanned with CamScanner

and 9. After amalgamation of marks obtained in written and physical test, the final merit list shall be prepared as per steps mentioned in the Government Resolution, issued by the General Administration Department, from time to time.

11. Recruitment to the post of Police Constable Driver shall be done as per procedure decided by the Government or the Director General, from time to time.

12. Reservation—

(*1*) *(i)* Reservation is applicable for Sports persons, Women, Ex-Serviceman, project affected persons and any other categories shall be as declared by the Government from time to time.

(ii) **Home Guards**– Out of the total posts available for recruitment to the post of Police Constable Driver in the Police Force, 5% posts (Parallel reservation) shall be filled in from amongst the members of Home Guards who have completed minimum three years of service *i.e.* 1095 days of consolidated service as Home Guards on the date of advertisement of recruitment and possess the requisite educational and physical qualifications and age limit as per these rules.

(iii) **Policeman's Ward**– 3% of the total posts (parallel reservation) available for recruitment of Police Constable Driver shall be reserved, for Wards of police personnel, who has superannuated or retired from Group-C or Group-D service:

Provided that, reservation shall not be applicable for the wards of police personnel who have retired voluntarily or have been retired compulsorily.

(2) All the categories enumerated in this rule shall be required to pass the eligibility criteria and obtain the requisite marks in the written and physical tests prescribed for the post.

13. Recruitment on compassionate ground– The procedure for compassionate appointment scheme shall be adopted as per the directions issued by the General Administration Department, from time to time.

14. A person appointed to the post mentioned in rules 3,4,5 and 6 shall be required to pass Hindi and Marathi language examinations according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

15. *(i)* A candidate appointed to the post mentioned in rule 6 shall be required to complete the training in any of the Police Training Centre prescribed for the post and pass required examinations in maximum of four attempts, failing which his or her services would stand terminated. During this period, he shall not be eligible for annual increment.

(ii) All the Annual increments, due to the candidate, shall be released on passing the above examination within stipulated attempts. However, no arrears shall be payable to the candidate against such notional Annual Increments given after clearance of the examination.

16. *(i)* A person appointed to the post Police Constable Driver recruited in the recruiting Police Unit shall not be eligible for transfer to executive duties but shall be eligible for inter-district transfer in the same cadre on request.

(ii) Police Constable Driver, shall be eligible for transfer to any other Police Unit in the State of Maharashtra, on the terms and conditions in respect of eligibility, transfer procedure, competent authority, seniority and other necessary terms and conditions prescribed by the Director General, with the approval of the Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. J. SOVITKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.

Scanned with CamScanner

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ८६] सोमवार, जून २७, २०२२/आषाढ ६, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २३९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जून २०२२

अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सन १९५१ चा २२)याच्या कलम ५च्या खंड (ख) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमास,महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०२२ असे म्हणावे. सदर नियम **शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ याच्या नियम ७ ते १० या ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येतील :—

"**७. शारीरिक चाचणी (५० गुण) :**

जे उमेदवार शारीरिक व शैक्षणिक अर्हता पूर्ण करतात अशा उमेदवारांना शारीरिक पात्रता चाचणी देणे आवश्यक असेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे ५० गुणांची असेल :—

Scanned with CamScanner

(तीन) कौशल्य चाचणीही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.

(चार) वाहन चालविण्यातील कौशल्य चाचणीचे निकष, महासंचालकाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील.

(पाच) वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्याकरिता, समितीमध्ये प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

१०. पोलीस महासंचालकांनी त्या घटकासाठी गठीत केलेले निवड मंडळ, हे या नियमांना पोट-नियम ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या शारीरिक चाचणी व लेखी चाचणी मधील प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी ही सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या, शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

शिरीष मोहोड,
शासनाचे उप सचिव.

Scanned with CamScanner

(B) The Written Test shall include the following subjects, namely :—

(1) Arithmetic,

(2) General Knowledge and Current Affairs,

(3) Intelligence Test,

(4) Marathi Grammar, and

(5) Motor vehicle driving and transport Rules.

(C) Duration of written test shall be 90 minutes. Questions asked in written test shall be objective type and test shall be conducted in Marathi language.

9. Skill Test for vehicle driving (50 Marks) :

(*i*) Candidates selected for Written test shall also have to undergo vehicle driving skill test mentioned below. Candidates shall have to secure a minimum of 40% marks in both skill tests taken together.

(*ii*) The skill test shall be consist of —

(A) Light motor vehicle driving test - 25 marks

(B) Jeep types vehicle driving test - 25 marks

(*iii*) The skill test being only a qualifying test, marks obtained in skill test shall not be included in the total marks considered for preparing merit list.

(*iv*) The criteria for skill test in driving shall be decided by Director General from time to time.

(*v*) Officers from Regional Transport Authority should be included in the Committee for conducting skill test in driving.

10. Selection Board constituted by the Director General shall prepare a merit list from amongst the candidates based on the total marks obtained in the physical test and written test mentioned in rules 7 and 8. After addition of marks obtained in Physical Test and Written Test, the final merit list shall be prepared as per steps mentioned in the Government Resolution, issued by the General Administration Department in this regard from time to time."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHIRISH MOHOD,
Deputy Secretary to the Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with CamScanner

RNI No. MAHBIL/2009/37831

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १३८ (१२)] गुरुवार, नोव्हेंबर ३, २०२२/कार्तिक १२, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४१०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमान्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२.

अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक एमटीएस-०३१९ /प्र.क्र.२४५ /पोल-४.— महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे : —

१. या नियमांस, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) (चौथी सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ याच्या नियम ६ मध्ये, पोट-नियम (१) मधील, खंड (अ) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल : —

"परंतु आणखी असे की, कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे, १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गांचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदांसाठी सन २०२० व २०२१ या कॅलेंडर वर्षांतील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेसाठी, एक वेळची उपाययोजना म्हणून, पात्र असतील".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शिरीष मोहोड,
शासनाचे उप सचिव.

Scanned with CamScanner

HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 3rd November, 2022.

NOTIFICATION

MAHARASHTRA POLICE ACT.

No. MTS-0319/C.R.245/POL-4.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act, 1951 (XXII of 1951) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) (Fourth Amendment) Rules, 2022.

2. In rule 6 of the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, in sub-rule (1), in clause (*a*), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, due to Covid-19 pandemic, the candidates of all categories who have crossed the upper age limit during the period 1st January, 2020 to 31st December, 2022 shall be eligible for recruitment process to be conducted for filling up vacancies of the calendar year 2020 and 2021 for the said post by selection, as a one-time measure".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHIRISH MOHOD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with CamScanner

Exhibit - N

अतितातकाळ/महत्त्वाचे
क्रमांक प्रशि./पो.शि.भरती/चालक-सेवाप्रवेश नियम /४३७/२०१९ /१.१/ मुंबई, दिनांक /०३/२०२१

संदर्भ :- महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९

विषय :- महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ च्या अनुषंगाने कौशल्य चाचणी घेण्यासाठी मार्गदर्शिका व समिती गठीत करण्याबाबत.

***

परिपत्रक

महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ दिनांक ०६.०९.२०१९ अन्वये नियमित करण्यात आलेले आहेत.

२. सन २०१९ च्या महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) च्या नियमातील नियम ८ मध्ये पुढीलप्रमाणे आहे :-

(१) शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी खालीलप्रमाणे दयावी लागेल

(२) सदर कौशल्य चाचणीमध्ये खालील बाबी अंतर्भुत असतात.

(अ) हलके वाहन (LMV) प्रकारातील वाहन चालविणे - ७५ गुण
(ब) जीप प्रकारातील वाहने चालविणे - २५ गुण

(३) सदरहू चाचणी अहता असल्याने, सदरहू चाचणीत प्राप्त झालेले गुण गुणवत्ता यादी तयार करताना विचारात घेतले जाणार नाहीत.

(४) सदर चाचणी चालवण्याच्या कौशल्य चाचणीबाबतचे निकष वेळोवेळी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत ठरविण्यात येतील.

उपरोक्त नियमाच्या आधारे महाराष्ट्र पोलीस चालक पोलीस शिपाई भरतीसाठी वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी परीक्षा घेण्यासाठी मार्गदर्शिका तयार करण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न)

(५) सदर पदासाठी कौशल्य चाचणी परीक्षा घेण्यासाठी गठीत करावयाच्या समितीस प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यांत येईल.

३. उपरोक्त नमूद नियमाच्या आधारे वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणी घेण्यासाठी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्याबाबत मान्यता दिलेली आहे :-

पोलीस आयुक्तालयासाठी

१. मोटार परिवहन अधिकारी (पोलीस उप निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक
२. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
३. प्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रतिनिधी सहायक परिवहन निरीक्षक अधिकारी या दर्जापेक्षा कमी नसलेला

Scanned with CamScanner

३३ (२५१)

जिल्ह्यासाठी	१. मोटार परिवहन अधिकारी (पोलीस उप निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक) २. पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) ३. प्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रतिनिधी सहायक परिवहन विभागातील अधिकारी या दर्जापेक्षा कमी नसलेला
राज्य राखीव पोलीस बलासाठी	१. मोटार परिवहन अधिकारी (पोलीस उप निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक) २. सहायक समादेशक ३. प्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रतिनिधी सहायक परिवहन विभागातील अधिकारी या दर्जापेक्षा कमी नसलेला
लोहमार्ग विभागासाठी	१. मोटार परिवहन अधिकारी (पोलीस उप निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक) २. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) ३. प्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रतिनिधी सहायक परिवहन विभागातील अधिकारी या दर्जापेक्षा कमी नसलेला

तसेच महाराष्ट्र पोलीस चालक पोलीस शिपाई भरतीसाठी वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणी परीक्षा घेण्यासाठी मार्गदर्शिका तयार करण्यांत आलेली आहे. (प्रत संलग्न)

तरी वरील नमूद केल्याप्रमाणे पोलीस शिपाई चालकांच्या भरतीसाठी कौशल्य चाचणीसाठीचे नियम लागू राहतील.

(मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)

(संजय कुमार)
अपर पोलीस महासंचालक
प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई

प्रति.

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसहीत)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गासहीत)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९

प्रत :-

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक व कारागृह निरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

प्रत सविनय सादर:-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned with CamScanner


महाराष्ट्र पोलीस

चालक पोलीस शिपाई भरती

वाहन चालविण्याची

कौशल्य चाचणी परीक्षा

मार्गदर्शिका



Scanned with CamScanner

35 263

:- मार्गदर्शिका -:

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब दि. ७ सप्टेंबर २०१९ अन्वये **महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक व पोलीस शिपाई चालक, २०१९** या पदांचे भरतीप्रवेश नियम निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामधील नियम क्र. ८ (२) मध्ये वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सदरची कौशल्य चाचणी ही ५० गुणांची असुन त्या चाचणीमध्ये खालील बाबी अंतर्भुत आहे.

अ) हलके वाहन (LMV) प्रकारातील वाहन चालविणे २५ गुण

ब) जीप प्रकारातील वाहन चालविणे २५ गुण

सदरहु दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

अ) हलके (LMV) प्रकारातील वाहन चालविणे एकुण २५ गुण

सदरची चाचणी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये उपलब्ध असलेल्या टाटा ४०७ / ४१० या प्रकारच्या वाहनांवर घेण्यात यावी.

या प्रकारातील वाहन चालविण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासण्यासाठी खालील प्रकारच्या वाहन चालविण्याच्या चाचण्यांचा समावेश करावा.

१. **चढावर वाहन चालविणे (Up Gradient Driving Test) -** १० गुण

या चाचणीचा मुख्य उद्देश वाहन चढावर चालवित नेऊन समुद्र ठिकाणी ठराविक कालावधीकरीता थांबवून पुन्हा क्लच, ब्रेक व ॲक्सिलेटरचा वापर करुन वाहन बंद होवू न देता पुढील दिशेस चालविता येण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासणी करणे असा आहे.

Scanned with CamScanner

वाहन चालविण्याच्या चाचणीचा क्रम (Sequence of Driving Test)

अ) वाहन समोरच्या दिशेने (Forward) गतीवर चालविणे नेणे.

ब) STOP दर्शविलेल्या ठिकाणी ब्रेक लावून १० सेकंदापर्यंत वाहन उभे करणे. या ठिकाणी वाहनाच्या पार्किंग (Hand) ब्रेकचा वापर करु नये.

क) वाहन बंद न पाडता किंवा स्वत: बंद न करता क्लच, ब्रेक व ॲक्सिलेटरचा वापर करुन वाहनावर नियंत्रण ठेवून वाहन पुन्हा समोरच्या दिशेने चालविणे व उतार पूर्ण करुन समाप्ती रेषेपर्यंत सरळ दिशेने वाहन चालविणे.

गुणांकण पध्दत -

१. सदरची चाचणी २ मिनिटे ३० सेकंद (१५० सेकंद) इतक्या कालावधीमध्ये पुर्ण करणे अनिवार्य आहे.

२. वर नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराने वाहन विहित कालावधीत अचुक पध्दतीने चालविल्यास त्यास पुर्ण १० गुण देण्यात यावे.

३. सदरची चाचणी विहित कालावधीमध्ये पुर्ण न केल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.

४. चाचणी दरम्यान वाहन बंद पडल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.


५. आकृती LMV -01 मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन १० सेकंद चढावर उभे केल्यानंतर पुढील दिशेने नेते वेळी जर वाहनाचे मागील टायर मार्किंग F- १ (Fault) च्या रेषेस स्पर्श झाल्यास किंवा ओलांडल्यास ३ गुण कमी करण्यात यावे. (F-१ रेषा म्हणजे चाचणीकरीता वापरण्यात येणा-या वाहनाचे मागील चाकाचा जमिनीस स्पर्श करणारा शेवटच्या बिंदुमधुन जाणारी रेषा)

६. मार्किंग F- २ (Fault) च्या रेषेस स्पर्श झाल्यास ६ गुण कमी करण्यात यावे. (F- २ रेषेची आकृतीत दर्शविल्या प्रमाणे F-१ रेषेच्या खालोखाल ०.४५ मिटर (साधारण १.५ फुट) इतक्या अंतरावर आखणी करावी.)

७. वाहनाचे मागील टायर मार्किंग F-२ (Fault) या रेषेस संपुर्णपणे ओलांडल्यास शुन्य गुण देण्यात यावेत.

Scanned with CamScanner

LMV-01



*WIDTH OF DRIVING TRACK SHOULD BE 6 METER.

UP GRADIENT DRIVING TEST TRACK

ALL DIMENSIONS ARE IN METER

Scanned with CamScanner

38

५ गुण

२. **समांतर पार्किंग करणे (Parallel Parking) -**

या चाचणीचा मुख्य उद्देश वाहन मागील दिशेने चालवित आणुन नियंत्रित ठिकाणी पार्किंग करण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासणे असा आहे.

वाहन चालविण्याच्या चाचणीचा क्रम (Sequence of Driving Test)

अ) मुख्य रस्त्यावर वाहन चालवित जावून STOP पार्किंग केलेल्या रेषेपर्यंत जावून थांबविणे.

ब) वाहन रिव्हर्स गिअरमध्ये मागील बाजुस चालवित आणुन मुख्य रस्त्याच्या बाजुस नियोजीत असलेल्या पार्कींगच्या जागेमध्ये समांतर पार्क करणे.

गुणांकण पध्दत -

१. सदरची चाचणी २ मिनिटे (१२० सेकंद) इतक्या कालावधीमध्ये पुर्ण करणे अनिवार्य आहे.

२. वर नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराने वाहन विहित कालावधीत अचुक पध्दतीने चालविल्यास त्यास पुर्ण ५ गुण देण्यात यावे.


३. सदरची चाचणी विहित कालावधीमध्ये पुर्ण न केल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.

४. चाचणी दरम्यान वाहन बंद पडल्यास १ गुण वजा करण्यात यावा.

५. आकृती LMV - 02 मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन पार्किंग करतेवेळी लाईन F-१, F-२, F-३ ला वाहनाच्या टायरचा स्पर्श झाल्यास प्रत्येक स्पर्शास २ गुण कमी करण्यात यावेत.

Scanned with CamScanner

LMV-02



PARALLEL PARKING TEST TRACK

ALL DIMENSIONS ARE IN METER

Scanned with CamScanner

४०

२७

३. इंग्रजी 'C' आकारानुसार रिव्हर्स वाहन चालविणे

(C Type Reverse Driving)- १० गुण

या चाचणीचा मुख्य उद्देश वाहन वळणावर मागील दिशेने चालविण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासणे असा आहे.

वाहन चालविण्याच्या चाचणीचा क्रम (Sequence of Driving Test)

आकृती LMV-03 मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन सुरवातीच्या A बिंदुपासुन (Entry Point) रिव्हर्स गिअरमध्ये मागील दिशेने (Reverse) शेवटच्या B बिंदुपर्यंत (Exit Point) चालविणे.

गुणांकण पध्दत -

१. सदरची चाचणी २ मिनिटे (१२० सेकंद) इतक्या कालावधीमध्ये पुर्ण करणे अनिवार्य आहे.

२. वर नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराने वाहन आजुबाजुच्या सीमारेषेस स्पर्श न करता विहित कालावधीत अचुक पध्दतीने चालविल्यास त्यास पुर्ण १० गुण देण्यात यावे.


३. सदरची चाचणी विहित कालावधीमध्ये पुर्ण न केल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.

४. चाचणी दरम्यान वाहन बंद पडल्यास १ गुण वजा करण्यात यावा.

५. आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन चालविताना आजुबाजुच्या सीमा रेषेस वाहनाच्या टायरचा स्पर्श झाल्यास अशा प्रत्येक वेळी २ गुण कमी करण्यात यावेत.

Scanned with CamScanner

LMV-03



"C" TYPE DRIVING TEST TRACK

ALL DIMENSIONS ARE IN METER

8

Scanned with CamScanner

ब) **जीप (Jeep) प्रकारातील वाहन चालविणे** एकूण २५ गुण

सदरची चाचणी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये उपलब्ध असलेल्या बोलेरो / सुमो / टियुव्ही / स्कॉर्पिओ या प्रकारच्या वाहनांवर घेण्यात यावी.

या प्रकारातील वाहन चालविण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासण्यासाठी खालील प्रकारच्या वाहन चालविण्याच्या चाचण्यांचा समावेश करावा.

१. **चढावर वाहन चालविणे (Up Gradient Driving Test) -** १० गुण

या चाचणीचा मुख्य उद्देश वाहन चढावर चालवित नेऊन नमुद ठिकाणी ठराविक कालावधीकरीता थांबवून पुन्हा क्लच, ब्रेक व ॲक्सिलेटरचा वापर करुन वाहन बंद होवू न देता पुढील दिशेस चालविता येण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासणी करणे असा आहे.

वाहन चालविण्याच्या चाचणीचा क्रम (Sequence of Driving Test)

अ) वाहन समोरच्या दिशेने चढावर चालवित नेणे.

ब) STOP दर्शविलेल्या ठिकाणी ब्रेक लावून १० सेकंदापर्यंत वाहन उभे करणे.

क) वाहन बंद न पाडता किंवा स्वत: बंद न करता क्लच, ब्रेक व ॲक्सिलेटरचा वापर करुन वाहनावर नियंत्रण ठेवून वाहन पुन्हा समोरच्या दिशेने चालविणे व उतार पुर्ण करुन समाप्त रेषेपर्यंत सरळ दिशेने वाहन चालविणे.

गुणांकण पध्दत -

१. सदरची चाचणी २ मिनिटे ३० सेकंद (१५० सेकंद) इतक्या कालावधीमध्ये पुर्ण करणे अनिवार्य आहे.

२. वर नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराने वाहन विहित कालावधीत अचुक पध्दतीने चालविल्यास त्यास पुर्ण १० गुण देण्यात यावे.

३. सदरची चाचणी विहित कालावधीमध्ये पुर्ण न केल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.

४. चाचणी दरम्यान वाहन बंद पडल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.


५. आकृती JEEP -04 मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन १० सेकंद चढावर उभे केल्यानंतर पुढील दिशेने नेते वेळी जर वाहनाचे मागील टायर मार्किंग F- १ (Fault) च्या रेषेस स्पर्श झाल्यास किंवा ओलांडल्यास ३ गुण कमी करण्यात यावे. (F-१ रेषा म्हणजे चाचणीकरीता वापरण्यात येणा-या वाहनाचे मागील चाकाचा जमीनीस स्पर्श करणारा शेवटचा बिंदुमधुन जाणारी रेषा)

६. मार्किंग F- २ (Fault) च्या रेषेस स्पर्श झाल्यास ६ गुण कमी करण्यात यावे (F- २ रेषेची आकृतीत दर्शविल्या प्रमाणे F-१ रेषेच्या खालोखाल ०.४५ मिटर (साधारण १.५ फुट) इतक्या अंतरावर आखणी करावी.)

७. वाहनाचे मागील टायर मार्किंग F-२ (Faul) या रेषेस संपुर्णपणे ओलांडल्यास शुन्य गुण देण्यात यावेत.

Scanned with CamScanner

JEEP-04



*WIDTH OF DRIVING TRACK SHOULD BE 6 METER

UP GRADIENT DRIVING TEST TRACK

ALL DIMENSIONS ARE IN METER

Scanned with CamScanner

२. इंग्रजी '8' अंकानुसार वाहन चालविणे (Type '8' Driving Test) : ५ गुण
या चाचणीचा मुख्य उद्देश नागमोडी वळणावर मर्यादित वेळेत उमेदवाराचे वाहन चालविण्याचे कौशल्य तपासणे असा आहे.

वाहन चालविण्याच्या चाचणीचा क्रम (Sequence of Driving Test)

वाहन सुरवातीच्या 'A' बिंदुपासुन (Entry Point) आकृती JEEP -05 मध्ये दर्शविल्याप्रमाणे बाणाच्या खुणाप्रमाणे पुढील दिशेने (Forward) शेवटच्या 'B' बिंदुपर्यंत (Exit Point) चालविणे.

गुणांकण पध्दत -

१) सदरची चाचणी उमेदवाराने १ मिनिट १५ सेकंद (७५ सेकंद) मध्ये पुर्ण करणे अनिवार्य आहे. या कालावधीपेक्षा जास्त वेळ उमेदवारास लागल्यास २ गुण कमी करण्यात यावेत.


२) चाचणी दरम्यान वाहन बंद पडल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.

३) वर नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराने ट्रॅकमध्ये वाहन चालविताना आजुबाजुस असलेल्या सीमारेषेस स्पर्श न करता विहित कालावधीत अचुक पध्दतीने वाहन चालविल्यास त्यास पुर्ण ५ गुण देण्यात यावे.

४) उमेदवाराने ट्रॅकमध्ये वाहन चालविताना आजुबाजुस असलेल्या सीमारेषेस वाहनाच्या टायरचा स्पर्श झाल्यास अशा प्रत्येक वेळेस १ गुण कमी करण्यात यावा.

Scanned with CamScanner

JEEP-05



"8" TYPE DRIVING TEST TRACK

ALL DIMENSIONS ARE IN METER

Scanned with CamScanner

३. इंग्रजी 'H' आकाराच्या ड्रायव्हींग ट्रॅकमध्ये वाहन चालविणे. १० गुण

(H Type Driving Track Test) -

या चाचणीचा मुख्य उद्देश मर्यादित जागेमध्ये उजवीकडे व डावीकडे तसेच पुढील व मागील बाजुस अचुकतेने वाहन चालविण्याचे उमेदवाराचे कौशल्य तपासणे असा आहे.

वाहन चालविण्याच्या चाचणीचा क्रम (Sequence of Driving Test)

१) आकृती JEEP-06 मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन सुरवातीच्या 'A' बिंदुपासुन सरळ रेषेत 'B' बिंदुपर्यंत चालविणे.

२) 'B' बिंदुपासुन वाहन रिव्हर्स गिअरमध्ये मागील दिशेने उजवीकडे वळण घेवून 'C' बिंदुपर्यंत चालविणे.

३) वाहन 'C' बिंदुपासुन सरळ रेषेत (Forward) 'D' बिंदुपर्यंत चालविणे.

४) 'D' बिंदुपासुन वाहन रिव्हर्स गिअरमध्ये मागील दिशेने डावीकडे वळण घेवून 'A' बिंदुपर्यंत चालविणे.

गुणांकण पध्दत -

१. सदरची चाचणी २ मिनिटे (१२० सेकंद) इतक्या कालावधीमध्ये पुर्ण करणे अनिवार्य आहे.

२. सदरची चाचणी विहित कालावधीमध्ये पुर्ण न केल्यास २ गुण वजा करण्यात यावेत.

३. चाचणी दरम्यान वाहन बंद पडल्यास २ गुण वजा करण्यात यावे.


४. वर नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराने वाहन आजुबाजुच्या सीमारेषेस स्पर्श न करता विहित कालावधीत अचुक पध्दतीने वाहन चालविल्यास त्यास पुर्ण १० गुण देण्यात यावे.

५. आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहन चालविताना आजुबाजुच्या सीमा रेषेस वाहनाच्या टायरचा स्पर्श झाल्यास अशा प्रत्येक वेळी २ गुण कमी करण्यात यावेत.

६. आकृतीत JEEP - ०६ दर्शविल्याप्रमाणे वाहन चाचणीच्या क्रमातील १ व ३ मध्ये फॉरवर्ड गिअरचाच वापर करावा व वाहन चाचणीच्या क्रमामधील २ व ४ मध्ये रिव्हर्स गिअरचाच वापर करावा. अन्यथा उमेदवारास शुन्य गुण देण्यात यावेत.

Scanned with CamScanner

JEEP-06



SEQUENCE OF DRIVING TEST

(A-B-C-D-A)

1. POINT A TO B [FORWARD DRIVING]
2. POINT B TO C [REVERSE DRIVING]
3. POINT C TO D [FORWARD DRIVING]
4. POINT D TO A [REVERSE DRIVING]

"H" TYPE DRIVING TEST TRACK

ALL DIMENSIONS ARE IN METER.

Scanned with CamScanner

सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना -

१. हलके तसेच जीप प्रकारातील वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेते वेळी आवश्यक असलेल्या ड्रायव्हींग ट्रॅकच्या आकृतीत दर्शविलेप्रमाणे मोजमापानुसार आखणी करुन घेण्याची व्यवस्था संबंधीत घटकांनी करावी.

२. आवश्यक त्या ठिकाणी ड्रायव्हींग ट्रॅकच्या सीमेवर बॅरिकेटस तसेच पार्कींग कोनचा वापर करण्यात यावा.

३. वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी शक्यतो पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणावर घेण्यात यावी.

४. कौशल्य चाचणीकरीता वापरण्यात येणारी वाहने सुस्थितीत असावीत.

५. मार्गदर्शिकेमध्ये नमुद केलेल्या विविध चाचण्या CCTV Camera च्या निगराणी खाली घेण्यात याव्यात.


६. उमेदवाराची ड्रायव्हींग चाचणी घेण्यापुर्वी प्रत्येक उमेदवारास केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ नियम क्र. १५ ड्रायव्हींग टेस्ट या अंतर्गत नमुद केलेल्या सुचनांचे (वाहन चालविते वेळी उमेदवाराकडुन अपेक्षित असलेल्या बाबींचे) काटेकोरपणे पालन करणेबाबत निर्देशित करण्यात यावे.

७. उमेदवाराच्या वाहन चालविण्याच्या चाचणी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये यास्तव योग्य ती खबरदारी घेण्यात यावी.

८. उमेदवारास ड्रायव्हींग चाचणीचे गुण देतेवळी मार्गदर्शिकेमध्ये नमुद केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

Scanned with CamScanner


LMV 01-3D



UP GRADIENT DRIVING TEST TRACK(3D VIEW)

Scanned with CamScanner

JEEP 04-3D



UP GRADIENT DRIVING TEST TRACK(3D VIEW)

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

Exhibit - O

51

अतितात्काळ/महत्त्वाचे

क्रमांक प्रशिक्षण/शि चालवा भरती/शारीरिक चाचणी/पुणे/५३८/२०१९/1898 मुंबई, दिनांक 15 NOV 2019

संदर्भ :- शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक पीएसआय-२०१९/प्र.क्र.२५३/पोल-५, दिनांक ०६.०९.२०१९.

विषय :- पोलीस शिपाई चालक पदाच्या भरती प्रक्रियेत शारीरिक चाचणीसाठी आकारावयाचे गुणांबाबत.

* * * * * *

परिपत्रक:-

पोलीस घटकातील चालक संवर्गातील पदे भरण्यासाठी शासनाने संदर्भाधीन, दिनांक ०६.०९.२०१९ रोजी आदेशान्वये "महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९" निर्गमित केलेले आहेत.

२. वरील सेवाप्रवेश नियमांतील तरतुदीनुसार पोलीस शिपाई चालकांची पदे थेट भरतीने प्रत्यक्ष परीक्षेद्वारे सरळसेवेने भरावयाची आहे. सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस शिपाई चालक पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची ५० गुणांची शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. त्यामध्ये पुरुष उमेदवारांची ३० गुणांची १६०० मीटर धावणे व २० गुणांची गोळाफेक चाचणी आणि महिला उमेदवारांची ३० गुणांची ८०० मीटर धावणे व २० गुणांची गोळाफेक चाचणी घेण्यात येणार आहे. सदरहू चाचणीसाठी द्यावयाच्या गुणांचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

पुरुष उमेदवार (१६०० मीटर धावणे)

१६०० मीटर अंतर पूर्ण करण्यास लागलेला कालावधी	द्यावयाचे गुण
५ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	३०
५ मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	२७
५ मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	२४
५ मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि.१० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	२१
६ मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि.३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी	१८
६ मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	१५
६ मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	१०
७ मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मि. ३० सेकंदापेक्षा कमी.	०५
७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त.	००

पुरुष उमेदवार- गोळाफेक (गोळ्याचे वजन ७.२६० कि.ग्रॅ.)

गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये)	द्यावयाचे गुण
८.५० मीटर किंवा जास्त	२०
७.९० मीटर किंवा जास्त परंतु ८.५० मीटरपेक्षा कमी	१८
७.३० मीटर किंवा जास्त परंतु ७.९० मीटरपेक्षा कमी	१६
६.७० मीटर किंवा जास्त परंतु ७.३० मीटर पेक्षा कमी.	१४
६.१० मीटर किंवा जास्त परंतु ६.७० मीटर पेक्षा कमी.	१२
५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.१० मीटर पेक्षा कमी.	१०
४.९० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटर पेक्षा कमी.	०८
४.३० मीटर किंवा जास्त परंतु ४.९० मीटर पेक्षा कमी.	०६
३.७० मीटर किंवा जास्त परंतु ४.३० मीटर पेक्षा कमी.	०४
३.१० मीटर किंवा जास्त परंतु ३.७० मीटर पेक्षा कमी.	०२
३.१० मीटर पेक्षा कमी.	००

Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

52

महिला उमेदवार (८०० मीटर धावणे) ८०० मीटर अंतर पूर्ण करण्यास लागलेला कालावधी	गुणांचे गुण
२ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी	३०
२ मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ०० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी	२५
३ मि.०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	२४
३ मि.१० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. २० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	२२
३ मि.२० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी	२०
३ मि.३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ४० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी	१८
३ मि.४० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी	१५
३ मि.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ४ मि. ०० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी.	००
४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त.	

महिला उमेदवार- गोळाफेक (गोळ्याचे वजन ४ कि.ग्रॅ.) गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये)	गुणांचे गुण
६ मीटर किंवा जास्त	२०
५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.०० मीटरपेक्षा कमी	१६
५.०० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी	१२
४.५० मीटर किंवा जास्त परंतु ५.०० मीटर पेक्षा कमी.	०८
४.०० मीटर किंवा जास्त परंतु ४.५० मीटर पेक्षा कमी.	०४
४.०० मीटर पेक्षा कमी.	००

३. तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांनी सदर गुणांच्या तक्त्यानुसार उमेदवारांना शारिरीक चाचणीमध्ये गुण देण्याची कृपया दक्षता घ्यावी.

४. शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक आरसीटी-०३०९/प्र.क्र.६९२/पोल-५अ, दिनांक ९.९.२०११ व शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१६/प्र.क६०/पोल-५अ, दिनांक १७.३.२०१६ अन्वये वेळोवेळी सुधारित उमेदवारांसाठी देण्यात आलेल्या सवलती, पोलीस शिपाई चालक पदाच्या भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचण्यांना लागू राहतील.

(संजय सक्सेना)
अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई व लोहमार्ग सह)

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)

प्रत सविनय सादर:

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

पोलीस उपमहानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती / गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

Scanned with CamScanner